महासचिवांचा अहवाल

**१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९**

प्रिय वाचक मित्रहो सन २०१८—२०१९ या वर्षाच्या महासचिवांचा अहवाल आपल्या हाती देताना महासचिव म्हणुन मला ख—या अर्थाने आनंद होत आहे. संस्थेच्या स्थापनेला आज तब्बल १२ वर्षे पूर्ण झाली. परंतु कधी नव्हे एवढे १५ उपक्रम संस्थेने सबंध वर्षाभरात राबविले. हे ख—या अर्थाने आमच्या सहका—यांचे व आपण दिलेल्या योगदानाचे यश आहे असे मी मानतो.

अगदी ठळक नमुद करायचे झाल्यास याच वर्षात संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर यांचा पुण्याच्या रोटरी क्लब ऑफ टाउन यांच्या वतीने चिराग पुरस्कार देवुन सन्मान करण्यात आला. कदाचित संस्थेचे भरीव काम बघुनच हा पुरस्कार त्यांना देण्यात आला असावा. व त्याची हि पोच पावती आहे. असे म्हणण्यास काही वावगे नाही. भारती खामटे हया अंध महिलेला व्यवसायायाकरीता एक स्टॉल देण्यात आला. तर शिवसेना प्रमुख मा. उद्दवजी ठाकरे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरीचे प्रकाशन व केंद्रीय मंत्री सुरेश प्रभु यांच्या हस्ते दिवंगत पंतप्रधान अट्टल बिहारी वाजपेयी यांच्या कविता संग्रहाचे प्रकाशन अशी काही ठळक उदाहरणे विशद करता येतील. बाकी उपक्रम खाली नमुद केलेले आहेत.





Rotary

The Board of Directors 2017-18 and The Members of Rotary Club of Pune Uptown are honoured to confer the Prestigious

Chirag Award
2017-18
on
Mr. Arun Bharaskar.

(President of Blind Welfare Organisation Nasik)

Mr. Arun Bharaskar, you are working for the social awareness and development of the blind. We are proud to know that you have started Scholarship Scheme offering scholarship to blind students for post graduation.

You have been instrumental for getting Self Employment opportunities to the needy blind people.

You have been propogating Education and Training programs and running musical academy named 'Brahmanand Musical Academy' at Nashik and imparting free musical training for the blind people to become self supporting.

You have been the Visionary behind the running of a computer training center for the blind with the help of talking [illegible]

You have taken active part in the Publication of Braille Books and published books like 'Nishabda' as well as 'Arogya Sanjivani' health related book to help the blind to take care of their health.

You have encouraged Sports Activities for the blind.You are organizing Cricket tournaments every year on State as well as National Level and have also won the World Cup of Blind's Cricket held in South Africa.

In true sense you, Mr. Arun Bharaskar, are a 'Man with a Vision 'overcoming your own Visual impediment.

Ever smiling, ever energetic you, are a Gem of person . Rotary Club of Pune Uptown is privileged to confer the Prestigious 'Chirag Award for 2018' on you, Mr. Arun Bharaskar in the hands of DGN Rtn. Ravee Dhotre

On 15th May 2018.

Rtn. Deepa Dadhe
President 2017-18

Rtn. Sameer Bhide
Secretary 2017-18

१. **रक्त दान शिबिर** :— संस्था अंधांकरीता काम करते परंतु अंध व्यक्ती देखील समाजाचा एक उपयोगी घटक आहे. अंध व्यक्ती देखील समाजाचे देणे आहे. या भावनेने प्रथमच संस्थेद्वारा दि. २७ मे २०१८ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. २७ अंधबांधवानी या शिबिरात सहभागी होउन रक्तदान करून समाजापुढे एक आर्दश तयार केला. यावेळी संस्थेचे हितचिंतक हरीषजी बैजल साहेब यांनी (I am a blud donner) असा फोटो लावलेले टि शर्ट अंध बांधवांना दिले. तर अंध व्यक्तींना अवांतर ज्ञान मिळावे म्हणुन दिलिपसिंग बेनिवाल यांनी एफ. एम. रेडिओ रक्तदात्या अंध बांधवांना भेट स्वरूपात दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरित्या अध्यक्ष अरूण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील यांनी विशेष योगदान दिले



२. **शिष्यवृत्ती सोहळा व विवाह सोहळा उत्साहात संपन्न** :— मागील १२ वर्षांपासुन संस्थेच्या वतीने जे अंध विदयार्थी महाविदयालयात शिकतात अशा विदयार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणुन शिष्यवृत्ती योजना सुरू आहे. व त्याचाच भाग म्हणुन या वर्षीचा कार्यक्रम १ जुलै २०१८रोजी पुणे येथील पुणे सातारा रोडवरील स्वयंवर मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला. व या कार्यक्रमात १३२ अंध विदयार्थ्यांना १५००रू चे धनादेश मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले आणि याच कार्यक्रमात संदीप सोनकांबळे व अनिता वाळंबे आणि गणेश पाटील व पार्वती लोंढे या दोन अंध दांपत्यांचा विवाह लावण्यात आला. तसेच अंध व्यक्तींची इंग्रजी भाषा सुधारावी म्हणुन वुई क्लबच्या अध्यक्षा सुधा शहा यांच्या प्रयत्नाने नि:शब्द इंग्रजी व्याकरणाचे पुस्तके प्रकाशित करण्यात आले व त्याचे वितरण पुण्यातील सहा अंध शाळांना करण्यात आले. नंतर महाराष्ट्रातील देखील अंध शाळांना हि पुस्तके पाठविण्यात

आली. या कार्यक्रमास श्रीमंत दगडुशेठ हलवाई ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, खजिनदार महेश सुर्यवंशी, कोहिनुर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल, **दत्ता गायकवाड**, चाटे क्लासचे प्रफुल्ल चाटे, शरद शहा, कालिदास मोरे, व सचिन कर्णिक उपस्थित होते. यावेळी श्रीमंत दगडु शेट ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे यांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली. समाजपयोगी काम करणा—या संस्था अथवा व्यक्तींना दगडुशेठ हलवाई चारीटेबल ट्रस्ट नेहमीच मदतीचा हात देत राहिल अशी ग्वाही दिली. तर कृष्णकुमार गोयल यांनी यापेक्षाही अधिक भरीव कार्य करावे व अधिक अंध व्यक्तींचे विवाह आयोजित करावे. याकरीता कोहिनुर ग्रुप चे सदैव आपणास सहकार्य मिळेल असे आश्वासन दिले. दत्ता गायकवाड यांनी देखील शिष्यवृत्ती धारकांना शिकत रहा व आणखी यशाची शिखरे पार करा असे आपल्या मनोगतातुन विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री चाटे व जाधेवार यांनी देखील विदयार्थ्यांना शिक्षणाच्या नवनविन संधी उपलब्ध करून ज्ञान आत्मसात करावे अशा अपेक्षा व्यक्त केल्या. कार्यक्रमाकरीता दगडुशेठ हलवाई चारीटेबल ट्रस्ट, कोहिनुर ग्रुप यांचे भरीव सहकार्य मिळाले. किंबहुना त्यांच्या योगदानाशिवाय हा कार्यक्रम पुण्यात होउ शकला नसता. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता अध्यक्ष अरूण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील, व्ही. बी. गायकवाड, कोषाध्यक्षा विजया दबे व सौ. सपना चांडक यांनी आधिक परीश्रम घेतले.









३. **<u>अंध व्यक्तींच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप</u>** : —ज्या अंध व्यक्ती बेरोजगार आहेत अशा व्यक्तींना त्यांच्या पाल्यांचे शिक्षण सुसाहाय पणे व्हावे व त्यांच्या शिक्षणात खंड पडु नये म्हणुन संस्थेदृवारा दरवर्षी अशा व्यक्तींच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात येते. ज्यामुळे त्यांच्या शिक्षणास अडचणी येणार नाही. किंवा खारीचा वाटा म्हणुन हे सहाय करण्यात येते. यावर्षी रविवार दि. १५ जुलै २०१८ रोजी संस्थेच्या कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी नासिक जिल्हयातील ५० अंध व्यक्तींनी लाभ घेतला. यावेळी त्यांना शैक्षणिक साहित्य, वॉटरबॅग देण्यात आल्या. यावेळी महेंद्र ॲण्ड महिंद्रा चे एच. आर. रामकुमार, मिलिंद जहागिरदार, प्राघ्यापक कांगुणे सर उपस्थित होते. श्री. जहागिरदार यांनी मनोगतातुन सर्व विदयार्थ्यांचे कौतुक केले व भविष्यातही संस्थेने असेच उपक्रम राबवावे जेणे करून त्याचा लाभ गरजुंना होईल तसेच रामकुमार यांनी देखील संस्थेच्या उपक्रमांची प्रशंसा केली व विदयार्थ्यांनी कोणत्याही अडचणीला न डगमगता शिक्षण घेत रहावे असे अवाहन केले. तर प्राध्यापक कांगुणे यांनी मागील तीन वर्षापासुन मी या उपक्रमाचा साक्षिदार असुन भविष्यात देखील स्तुत्य उपक्रमांना कांगुणे परिवार बांधिल असल्याचे जाहीर केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता मानद अध्यक्षा कल्पना पांडे, महासचिव दत्ता पाटील, सौ. सपना चांडक यांनी विशेष परीश्रम घेतले.

४. **<u>आषाढी एकादशीनिमित्त भक्ती संगीताची मैफिल उत्साहात संपन्न</u>** :– सालाबादाप्रमाणे याही वर्षी संस्थेच्या वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधुन अंध व डोळस कलाकरांची एकत्रित 'पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी' या भक्तिमय मैफिलीचे आयोजन करण्यात आले. सदरचा कार्यक्रम २३ जुलै २०१८रोजी परशुराम सायखेडकर नाटयमंदीर नाशिक येथे सायंकाळी ६.०० वाजता संपन्न झाला. यावेळी आरंभी मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल रकुमाई च्या प्रतिमेची पुजा व दिप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी मंचावर उदयोजक श्यामराव केदार व संस्थेचे हितचिंतक गंगाधर जाधव उपस्थित होते. अंध व्यक्तीना दिसत नसले तरीही तो गायन अथवा वादनात डोळस व्यक्तींच्या बरोबरीने सादरीकरण करू शकतो. हा संदेश समाजापर्यंत पोहचावा हाच या मागील उद्देश आहे व याच कार्यक्रमात भारती खामटे या अंध महिलेस व्यवसायाकरीता स्टॉलची चावी संस्थेच्या मानद अध्यक्षां कल्पना पांडे यांनी सुपुर्द केली. या मैफलीत जितेंद्र देवरे, कांतीलाल क्षीरसागर, आज्ञा तुपलोंढे, यानी विविध संतांच्या रचना सादर केल्या. कांतीलाल क्षीरसागर या अंध कलावंतानी 'माझा भाव तुझया चरणी' 'इंद्रायणी काठी' 'तुज सगुण म्हणु कि निगुर्ण रे' 'कांदा मुळा भाजी' अशी एकापेक्षा एक सरस अभंग सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. तर जितेंद्र देवरे यांनी प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली 'पाउले चालती पंढरीची वाट' 'चंद्रभागेच्या तीरी उभा मंदिरी' हि गिते सादर करून रसिकांची मने जिंकली. गोरख भाके यांनी व्हायोलिनची साथ केली, ताल वादयाची साथ सुशिल केदारे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अध्यक्ष अरूण भारस्कर, कोषाध्यक्षा विजया दबे यांनी विशेष परिश्रम घेतले.



५. **<u>ज्ञानेश्वरी प्रकाशन सोहळा</u>** :– अंध व्यक्तींना आवड असतानाही ब्रेल लिपीत साहित्य खुपच कमी आहे. त्यानांही आध्यात्माची गोडी लागावी किंवा त्यांना एक ज्ञानाचे नवे दालन उपलब्ध व्हावे या उद्देशाने संस्थेने ब्रेल लीपीत ज्ञानेश्वरी ग्रंथ रूपांतरीत केला. त्याकरीता ठाणे रोटरी क्लब ऑफ सेंट्रल च्या नेहा निंबाळकर यांनी पुढाकार घेतला व आर्थिक पाठबळ दिले म्हणुनच हा उपक्रम राबविणे संस्थेस शक्य झाले. ज्ञानेश्वरी हा अतिशय महत्वाचा ग्रंथ आहे व त्याचे प्रकाशनही दिमाखदार पद्धतीने व्हावे अशी संस्थेची धारणा होती, म्हणुनच किंबहुना हा उपक्रम पुर्णत्वास नेण्याकरीता साक्षात माउलींचे अशिर्वाद मिळाले असे म्हटले तर वावगे नाही. या ब्रेल ग्रंथाचे प्रकाशन शनिवार दि. ११ ऑगष्ट २०१८ रोजी शिवसेना भवन मुंबई येथे शिवसेना प्रमुख उद्दवजी ठाकरे, खासदार संजय राउत, विदयामान केंद्रीय अवजड मंत्री अरविंद सावंत, ए. बी. पी. माझाा चे मुख्य संपादक राजीव खांडेकर या मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाले. या प्रसंगी अंध कलावंतानी 'भगव वादळ आल....' हया गीताचे सादरीकरण करून कार्यक्रमाला शुभारंभ केला. नंतर उद्दवजी ठाकरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेने ख—या अर्थाने दृष्टीबाधित व्यक्तींकडे ज्ञानाचे नवं दालन असल्याचे नमुद केले आहे. व असंख्य अंध बांधवाना लाभ मिळेल असेच कार्य अंध जनांकरीता उपयोगी असलेले उपक्रम संस्थेने सातत्याने राबवावेत शिवसेना सदैव आपल्या पाठीशी असल्याची ग्वाही दिली. व मी अश्वासनापेक्षा कामास प्राधान्य देतो. ए. बी. पी. माझाा चे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांनी डोळसांनाच ख—या अर्थाने अध्यात्माची ओळख होणे गरजेचे आहे लक्षात घेवुनच बहुदा संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर यांनी हा उपक्रम राबविला आणि म्हणुनच आम्ही लोकांना म्हणत असतो कि, 'उघडा डोळे पहा नीट' पण आता खरोखरच डोळे उघडण्याची वेळ आलेली आहे. अशा वक्त्यात खांडेकरानी संस्थेची प्रशंसा केली व अध्यक्षांचे कौतुकही केले. तर संजय राउत यांनी ''आम्ही असताना आपणास उद्दवजींची गरज पडणार नाही.'' अपणास मदत करण्यास आम्ही तत्पर आहोत. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता अध्यक्ष अरूण भारस्कर, कोषाध्यक्षा विजया दबे, मानद अध्यक्षा कल्पना पांडे, सौ. सपना चांडक यांनी विशेष परीश्रम घेतले.





६. **<u>वृक्षारोपण सोहळा संपन्न</u>** :— बुधवार दि. १५ ऑगष्ट २०१८ रोजी डोळस समाजाला एक संदेश मिळावा या भुमिकेतुन संस्थेच्या वतीने त्रंबकेश्वर तालुक्यातील माळेगाव या गावी प्राथमिक शाळा व ग्रामस्थांच्या सहकार्याने वृक्षारोपण कर्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात ११०० रोपांची ग्रामस्थांच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले. तर ५० विदयार्थ्यांना पाच पाच झाडे दत्तक देण्यात आली. व प्रोत्साहन म्हणुन त्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले. श्री त्रंबक कौले व संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर यांनी गणवेश खरेदीकरीता सहकार्य केले तर महींद्रा ॲण्ड महींद्रा कंपनीच्या वतीने झाडांची रोपे विनामुल्य दिल्याने संस्थेस कोणताही आर्थिक खर्च सोसावा लागला नाही. या वृक्षारोपण कर्यक्रमास ग्रामस्थांचा व विदयार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. ब—याच शेतक—यांनी रोपे स्वयंस्फुर्तीने शेतात लावण्यास मागुन घेतली. त्यामुळे पर्यवरणाच्या दृष्टीने प्रथमच राबविलेला उपक्रम यशस्वी झाला असे म्हणण्यास हरकत नाही.





७. **<u>ठाणे व नाशिक गुणगौरव कार्यक्रम उत्साहात संपन्न</u>** :—ज्या अंध व्यक्तींनी उत्तम गुण संपादन केले अशा विदयार्थ्यांचे कौतुक करणे हे संस्थेस क्रमप्राप्त वाटते. जर अशा होतकरू विदयार्थ्यांच्या पाठीवर शाबासकिची थाप मारली तर त्यांना अधिक प्रोत्साहन मिळेल या उद्देशाने मागील अकरा वर्षापासुन अंध विदयार्थ्यांकरीता गुणगौरव सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. खरेतर हा कार्यक्रम नाशिक, विदर्भ, व मराठवाडा या क्षेत्रापुरताच मर्यादित असायचा परंतु पुणे व मुंबई शहरातील अनेक विदयार्थी कला शाखेव्यतिरिक्त देखील अन्य शाखांमध्ये उत्तम गुण संपादन करत असल्याचे जाणवले म्हणुनच यंदा प्रथमच बुधवार दि. १५ ऑगष्ट २०१८ रोजी ठाण्याच्या रोटरी क्लब नॉर्थ एण्ड च्या संयुक्त विदयमाने ठाण्यातील वागळी ईस्टेट मध्ये गुणगौरव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उत्तम गुण मिळविलेल्या शंभर अंध विदयार्थ्यांचा यावेळी ज्ञानवर्धक पुस्तक, पांढरी काठी, पेन ड्राईव्ह व रोख रक्कम देवुन त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष अरूण भारस्कर यांनी केले तर रोटरी क्लबच्या शनभोर मुरली यांनी आपण विदयार्थ्यांनी मिळविलेले यश बघुन भारावुन गेलो. व भविष्यात देखील विदयार्थ्यांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम आयोजित केल्यास रोटरी क्लब सदैव आपल्या पाठीशी राहील अशी ग्वाही दिली. हयाच कार्यक्रमाचा भाग म्हणुन अशाच पद्धतीचा कार्यक्रम २ सप्टेंबर २०१८ रोजी जैन सोशल प्लॅटीनम ग्रुप यांच्या संयुक्त विदयमाने नाशिक पुणा

रोड येथील श्रीकुष्णा लॉन्स नाशिक येथे सायंकाळी ४ वाजता संपन्न झाला. हया कार्यक्रमात नासिक मराठवाडा, विदर्भ येथील एकुण १३५ अंध विदयार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास नाशिक शिक्षण विभाग मंडळाचे अध्यक्ष कृष्णकांत पाटील, महींद्रा ॲण्ड महींद्राचे तुषार शिंदे, खाबिया ग्रुपचे किरण खाबिया, धीरज पिचा, व जैन सोशल प्लॅटीनम ग्रुपचे असंख्य मेंबर उपस्थित होते. अध्यक्ष कृष्णकांत पाटील यांनी आपल्या मनोगतातुन विदयार्थ्यांचे कौतुक केले. पण विदयार्थ्यांनी या यशामुळे भारावुन न जाता उच्च शिक्षणाची शिखरे पादाक्रांत करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. कारण सध्याच्या युगात जेवढया शिक्षणाच्या नविन संधी निर्माण झाल्या त्याच तुलनेत अंध व्यक्तींना देखील नविन अभ्यासाची साधने उपलब्द असल्याने त्यांनी त्याचा योग्य तो उपयोग करावा तर किरण खाबिया यांनी देखील विदयार्थ्यांनी मिळवलेले यश बघुन सदर उपक्रम जैन सोशल ग्रुपच्या वतीने दर वर्षी राबवु असे आश्वासन दिले.







अध्यक्ष अरूण भारस्कर यांनी संस्थेच्या परीचयात कायमस्वरूपी शिष्यवृत्ती योजनेकरीता दत्तक पालक योजना सुरू केली असुन समाजातील या व्यक्तींना शक्य असेल अशा व्यक्तीने किमान एक तरी विदयार्थी दत्तक घ्यावा असे अवाहन केले. त्यानुसार महींद्रा ॲण्ड महींद्राचे तुषार शिंदे व जैन सोशल प्लॅटीनम ग्रुपचे सुनील बाफणा यांनी प्रत्येकी एक विदयार्थी दत्तक घेण्याचे जाहिर केले. विदयार्थ्यांना भेट वस्तुं व रोख रक्कम देवुन गौरविण्यात आले. याच कार्यक्रमात विदयार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज वितरीत करण्यात आले. विदयार्थी बाहेर गावचे असल्याने त्यांच्यासाठी प्रितिभोजनाची व्यवस्था आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता अध्यक्ष अरूण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील, कोषाध्यक्षा विजया दबे, सौ. सपना चांडक यांनी विशेष परीश्रम घेतले.

८. **गणेश उत्सवानिमित्त विविध स्पर्धा उत्साहात संपन्न :—** अंध व्यक्तींमध्ये कलागुण असतात व त्यांच्या कलागुणांना संधी मिळावी या उद्देशाने संस्थेच्या वतीने स्थानिक पातळीवर गणेश उत्सवाचे औचित्य साधुन विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे जेणेकरून अंध बांधवांच्या विचारांची देवाणघेवाण होते व सस्थेशी संलग्नता वाढते म्हणुन संस्थेच्या वतीने श्री गणेशाची स्थापना केली व २२ सप्टेंबर २०१८ रोजी खुला गट व लहान गटातल्या मुलांच्या वक्तृत्व, गायन व प्रश्नमंजुषा या आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक कृष्णा नाचगड याने पटकावला तर द्वितीय क्रमांक सुनील मोरे याने मिळविला. गायनात प्रथम क्रमांक तर उमेश गवांदे द्वितीय क्रमांक इशान गडाख याने मिळविला. लहान गटात यशराज शिंदे याला प्रथम क्रमांक तर शंतनु पवार यास द्वितीय क्रमांक मिळाला व प्रश्नमंजुषा स्पर्धा ए. बी. सी. डी. या चार गटात झाली डी. गटाला म्हणजेच विकास व्यव्हारे, राहुल धामणे, जय कृष्ण सानप, तारा उगले व आशा बेनके यांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता संस्थेच्या मानद अध्यक्षा कल्पना पांडे, महासचिव दत्ता पाटील, प्रतिभा होळकर, कोषाध्यक्षा विजया मराठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

९. **पांढरी काठी दिन साजरा :—** १५ ऑक्टोबर हा दिवस युनाइटेड नेशन्स ऑर्गनाइजेशन च्या आदेशानुसार संबंध जगभर पांढरी काठी दिन साजरा करण्यात येतो. या निमित्ताने शासन स्तरावर व सेवाभावी संस्था समाजात अंध व्यक्तींबद्दल जाग्रुती व्हावी म्हणुन विविध उपक्रम राबवितात. ज्या व्यक्तीच्या हातात पांढरी काठी आहे ती व्यक्ती अंध आहे असे समाजाला कळावे म्हणुन संस्थेच्या वतीने हा उपक्रम लायन्स क्लब हॉल पंडीत कॉलनी शरणपुर रोड नाशिक येथे मोठया दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात सुमारे १३५ अंध बांधवांना पांढ—या काठयांचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे काबरा एम्पोरीअर च्या वतीने जगदीश काबरा यांच्या हस्ते १० अंध दात्पत्यास महिनाभर पुरेल एवढा शिधा वाटप करण्यात आला. तसेच सुरेश पवार, हिरामण शिंदे व रोहिदास शिंदे या बांधवाना स्वयं रोजगाराकरीता आर्थिक मदत करण्यात आली. गुलाब जोरवर या अंध विदयार्थ्यास शैक्षणिक मदत देखील करण्यात आली. श्री. भगवान पवार या अंध कर्करोग पिडीत व्यक्तीस उपचाराकरीता १५०००/—रू. चा धनादेश देवुन सहकार्य करण्यात आले. तसेच याच वर्षी चंद्रकांत मैलगिरे या अंध कर्करोग पिडीत व्यक्तीच्या इलाजाकरीता १००००/— रू. चा धनादेश देवुन मदत करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन सोमेश्वर काबरा, लायन्स क्लब कार्पोरेट चे अध्यक्ष श्री. वानखेडे, पावा कट्रक्शनचे श्री. विलास पाटील, तसेच क्लबचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. संस्थेच्या मानद अध्यक्षा सौ कल्पना पांडे यांनी संस्थेचा परीचय करून दिला. प्रास्ताविक अरूण भारस्कर यांनी केले, महासचिव

दत्ता पाटील यांनी पांढरी काठी दिनाचे म्हत्व समजुन सांगितले. तर माननीय सोमेश्वर काबरा यांनी अंध बांधवांना शुभेच्छा देवुन संस्थेच्या स्तुत्य उपक्रमांची प्रशंसा करून भविष्यात भरीव मदतीचे अश्वासन दिले. शिधा वाटप करण्यासाठी सौरभ एंटर प्राईजेस चे श्री. सौरभ शहा यांनीही आर्थिक मदत दिली. गेल्या पाच वर्षांपासुन ते या शिधा वाटप उपक्रमास सातत्याने योगदान देत आहेत. कार्यक्रमाची सांगता करताना कोषाध्याक्षा विजया दबे यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे अभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता सौ. सपना चांडक व विशाल पाटील यांनी विशेष परीश्रम घेतले.





१०.**<u>दिवाळी फराळ व कपडे वाटप कार्यक्रम</u> :—** सर्व डोळस व्यक्तींप्रमाणेच अंध व्यक्तींनाही दिवाळी सणाचा आनंद घेता यावा म्हणुन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी धनत्रयोदशीचे अवचित्य साधुन संस्थेच्या वतीने ५ नोव्हेंबर २०१८ रोजी शालिमार नाशिक संस्थेच्या कार्यालयात दिवाळी सण साजरा करण्यात आला. या निमित्ताने ११० अंध बांधवांना एक किलो मिठाई, प्रत्येक महिलेस साडी व पुरूषास ड्रेस व दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास जैन सोशल ग्रुपचे अनिल नहार व सर्व पदाधिकारी, विजय हिरन, सतिष बागरेचा, प्रशांत बागमार, सुला वाईन्स चे संजीव पैठणकर, प्रतिष्ठीत उदयोजक आशा वेणु गोपाल व अधिक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दिपमाळ व आकाश कंदील लावुन तसेच जुन्या गाजलेल्या दिवाळी गितांची गाणे गाउन करण्यात आली. दिवाळी हा सण सर्वांसाठी जसे चैतन्य व आनंद घेवुन येते तसाच तो अंधाच्या जिवनात कायमस्वरूपी अंधार जरी असला तरी या दिवशी तरी प्रत्येक डोळस व्यक्ती प्रमाणेच त्यांनाही दिवाळसणाचा आनंद घेता यावा असाच प्रयत्न नेहमी संस्थेचा असतो.

या कार्यक्रमात संस्थेचे हितचिंतक व संचालक अर्जुन मुद्दा यांनी खास मुंबई येथुन रेमण्डचे पॅट पीस व शर्ट पीस अंध बांधवांना देवुन त्यांचा आनंद द्विगुणीत केला. उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे व मान्यवरांनी अंध बाधवांना दिवाळीच्या शुभच्छा दिल्या व ''प्रत्येक अंध असलेल्या व्यक्तीच्या जीवनात आम्ही प्रकाश तर नाही आणु शकत पण समाजामध्ये कुठेही कधाही त्यांना कशा प्रकारची कमतरता पडु नये हा आमचा सदैव प्रयत्न असेल.'' अशी प्रतिक्रिया सुला वाईन्सचे उपाध्यक्ष संजीव पैठणकर यांनी व्यक्त केली. तर श्री. जैन सोशल ग्रुपचे अनिल नहार यांनी देखील संस्थेच्या उपक्रमांची प्रशंसा करून ख—या अर्थाने अंध बांधवांच्या जीवनात दिवाळी सणाच्या आनंदाच्या भावना द्विगुणित केल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता अध्यक्ष अरूण भारस्कर, कोषाध्यक्षा विजया दबे, सौ. सपना चांडक यांनी विशेष परीश्रम घेतले.




११.**<u>राज्यस्तरिय क्रिकेट स्पर्धा ठाणे येथे संपन्न</u> :—** स्वत:चे भविष्य घडविणे हा मानवाच्या जिवनातील अविभाज्य घटक असला तरीही प्रत्येक व्यक्ती मध्ये काही सुप्त गुण छुप्या स्वरूपात असतात, खेळ, संगीत, अभिनय, नृत्य, वकृत्व अशा या विविध गुणांपैकी प्रत्सेकात काही ना काही गुण दडलेले असतात. मात्र ते व्यक्त करण्यासाठी व्यास पीठ किंवा मैदान मिळणे आवश्यक असते. अंध व्यक्तींची देखील हि गरज लक्षात घेवुनच त्यांच्यातील खेळाडु वृत्ती जोपासावी व त्यांच्या खेळाडु वृत्तीला वाव मिळावा म्हणुन संस्थेच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय

क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. व अंध व्यक्ती हा खेळ सराईतपणे खेळु शकतात त्यांच्यात अनेक सुप्त गुण असतात म्हणुन समाजात जागृती निर्माण व्हावी म्हणुन या स्पर्धा दरवर्षी वेगवेगळया जिल्हयात घेण्यात येतात. यावर्षी या स्पर्धा रोटरी क्लब ठाणे सेंट्रल यांच्या विशेष सौजन्याने ठाणे येथील वरतक नगर रेमण्ड स्टेडिअम येथे दि. १७ व १८ नोव्हेंबर २०१८ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. रोटरीच्या नेहा निंबाळकर यांनी या स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धाचा उद्‌घाटन संभारंभ शनिवारी सकाळी 9:00 वाजता ठाणे महानगर पालिका आयुक्त संजीव जैसवाल व मराठी अभिनेता उपेंद्र दाते यांच्या उपस्थित पार पडला.यावेळी बॅण्डच्या तालावर खेळाडुनी मान्यवरांना मानवंदना दिली. या स्पर्धाना सबंध राज्यभरातुन षेष महाराष्ट्र, मराठवाडा, पुणे, मुंबई, नाषिक, सोलापुर, चंद्रपुर, नागपुर असे ८ संघ सहभागी झाले होते. ही स्पर्धा दोन गटात बादफेरीने खेळण्यात आली. अंतिम सामना रेस्ट ऑफ महाराष्ट्र व नागपुर हया दोन संघात झाला हयामध्ये नागपुर संघ विजयी ठरला. महाराष्ट्र संघाने दुसरा क्रमांक पटकावला. तसेच बक्षिस वितरणासाठी आमदार मा. p`tap sarnaa[-k प्रांतपाल AaiSaYa gaaMgaulaI, अधिक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघास रोख १५०००रू व टॉफी देउन गौरविण्यात आले व उपविजेत्या संघास रोख ११,००० रू व ट्रॉफी देउन गौरविण्यात आले.

१२.

यावर्षी या स्पर्धे करिता, एल. आय. सी.,रोटरी क्लब ठाणे सेंट्रल, विहॅंगस चारीटेबल ट्रस्ट अध्यक्षा परीषाताई सरनाईक, व रोट्रॅक्स यांचे विषेष सहकार्य मिळाले. किंबहुना त्यांच्या सहकार्या षिवाय हया स्पर्धा यशस्वी होऊ षकल्या नसत्या. मात्र अंध खेळाडुंचा खेळ व उपक्रम बघुन हा उपक्रम पुढच्या वर्षीही रोटरीच्या वतीने नॅशनल लेव्हलवर हया स्पर्धा घेवु असे नेहा निंबाळकर यांनी जाहीर केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता अध्यक्ष अरूण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील, कोषाध्यक्षा विजया दबे व सौ. सपना चांडक यांनी आधिक परीश्रम घेतले.




१३.**पांडुरंग भेट व सहलीचे आयोजन :—** सहल हा लहानापासुन थोरांपर्यंत अतिशय आवडीचा विषय असतो. डोळस व्यक्ती सहलीचा आनंद मनमुराद लुटु शकतात परंतु अंध व्यक्तींची मात्र फार कुचंबना होते, कारण त्यांचा जबाबदारी कोण स्वीकारेल? शिवाय या अंधळयांना काय दिसत? त्यामुळे त्यांना सहलीला जायची गरज काय? हे प्रश्न निर्माण होतात. अगदी त्यांच्या घरातुनच त्याना डावलल जात. परंतु संस्था या बाबतीत सहानुभुती पुर्वक विचार करून सर्व अंध बांधवांना सहलीस घेवुन जाते. सध्याचे युग हे अतिशय धावपळीचे, मनुष्य म्हटले की धावपळ दगदग हि आलीच, मग नोकरी असो अथवा व्यवसाय असो मग त्याला अंध व्यक्ती तरी अपवाद कसा असणार. दररोजच्या धकाधकीच्या जीवनातुन विरंगुळा व्हावा किंवा मुक्तपणे आयुष्याचा आनंद घेता यावा जेणेकरून पुढील काम करण्यासाठी आपल्याला अधिक उत्साह व उर्जा निर्माण व्हावी या हेतुने मागील नउ वर्षापासुन संस्थेच्या वतीने सहलीचे व पांडुरंग भेटीचे आयोजन करण्यात येते. नेहमी प्रमाणेच यावर्षीही संस्थेचे हितचिंतक गंगाधर जाधव यांच्या पुढाकाराने २४ डिसेंबर २०१८ रोजी सहलीचे आयोजन केले. या यात्रेचे प्रस्थान कैलास मठातुन तुळजापुरकडे झाले. त्यानंतर पंढरपुर येथे सामुहिकरित्या विठठल दर्शन घेतले. अंध असतानाहि रांगेतुन दर्शन घेतले हे वैशिष्टय म्हणता येईल. तब्बल तीन तासांपेक्षा अधिक वेळ रांगेत उभे रहात पांडुरंगाचा जयजयकार करत दर्शन घेतले. त्यानंतर नरसोबाची वाडी, कोल्हापुरची महालक्ष्मी, पन्हाळगड व रायगड किल्ल्याच्या गड सर करण्याचा आनंद घेतला. प्रत्येक व्यक्तीच्या चेह—यावर उत्साह जाणवत होता सहलीचा संपुर्ण खर्चाचा भार संस्थेचे हितचिंतक श्री. जी. के. जाधव व श्री. गणेश गिते व नरेंद्र फिरोदिया यांनी स्वत: उचलल्याने संस्थेस कोणताही आर्थिक खर्च झाला नाही. मात्र, अंध व्यक्तींना आनंद मिळाला हे मात्र खरे. संस्थेच्या वतीने महासचिव दत्ता पाटील व कोशाध्यक्षा विजया दबे यांनी विशेष परिश्रम घेतले.






१४. **<u>अटल विश्वास कविता संग्रहाचे प्रकाशन :—</u>** समाज कार्य करता करता आमच्या संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर यांनी राजकिय क्षेत्रातील द्विंगत माजी पंतप्रधान मा. अट्टल बिहारी वाजपेयी यांचा काव्यसंग्रह देखील अंध बांधवांकरीता ब्रेल लीपीमध्ये उपलब्ध करून दिल. अट्टलजींनी त्याच्या प्रत्येक कवितेतुन काही ना काही संदेश दिला आहे, मानवी जीवन हे एकदाच मिळते त्याचा काहीतरी सद्पयोग करावा, नेहमी दुस—यांना देतच जावे, कुठल्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची तयारी असावी, आयुष्याच्या खडतर वाटांवर जिद्दीने व चिकाटीने पुढे जात राहवे, मिळण्या—या प्रत्येक अनुभवातुन चांगल्या गोष्टी घेत रहावे हे सर्व त्यांच्या कवितेतुन आपल्या अध्यक्षांना जाणवल आणि त्यांनी असा प्रेरणा देणारा अट्टलजींचा ''अट्टल विश्वास'' हा कवितासंग्रह आपल्या अंध बांधवांसाठी हा संग्रह निवडला. आणि त्यांची ही कल्पना मा.आशिषजी शेलार यांना खुप आवडली. त्यांनी पुढाकार घेवुन हया उपक्रमासाठी लागणारा सर्व खर्च केला अट्टलजी हे त्यांच्या हया काव्यस्रंहाच्या रूपाने ते सतत अंध बांधवांच्या मनात आठवणी रूपी राहतील.

या संग्रहाचे प्रकाशन अट्टल जयंती म्हणजेच दि. २५ डिसेंबर २०१८ रोजी स्पॅस्टीक सोसायटी, हॉटेल रंगशारदाजवळ, वांद्रे मुंबई येथे केंद्रीय मंत्री सुरेश प्रभु व आशिष शेलार यांच्या हस्ते मोठया दिमाखात झाले. हया कार्यक्रमात मुंबईच्या अंध शाळेतील विदयार्थीही सहभागी झाले होते. सुरेश प्रभु व आशिष शेलार यांनी आपल्या मनोगतातुन अट्टल बिहारी वाजपेयी बरोबरचे घडलेले प्रसंग कथन केले. व हा संग्रह सर्व अंधबांधवांपर्यंत पोहचला पाहिजे जेणे करून त्यांना त्याचा लाभ घेता येईल. .या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता अध्यक्ष अरूण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील, कल्पना पांडे, कोषाध्यक्षा विजया दबे व सौ. सपना चांडक यांनी आधिक परीश्रम घेतले.



१५. **<u>मुंबई येथे राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धांचे भव्य आयोजन (सियाराम कप)</u>**:— क्रिकेट हा खेळ आपल्या देशात अतिशय लोकप्रिय आहे. दरवर्षी मुंबई सेथे अंधांच्या क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामुळे अंधांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणाना वाव तर मिळतोच तसेच त्यांच्यातली खेळाडु वृत्ती जोपसली जाते. सांगायला विशेष आनंद वाटतो कि या स्पर्धांच्या माध्यमातुन निवडक अंध खेळाडु इंटर नॅशनल लेव्हलवर देखील खेळुन आले आहेत. मग त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानेच मागील सलग १० वर्षापासुन राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धांचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे. यावर्षी या स्पर्धा व कोटक महिंद्रा व सियाराम ग्रुप यांच्या विशेष सहकार्याने १४ ते १६ जानेवारी २०१९ रोजी या कालावधीत इस्लाम जिमखाना व सचिवालय जिमखाना येथे संपन्न झााल्या. या स्पर्धेचे उद्घाटन इस्लाम जिमखाना येथे मोठया दिमाखात संपन्न झाले. खेळाडुंमध्ये व एकुणच मैदानावर उत्साहाचे वातावरण निर्माण व्हावे म्हणुन बॅण्डच्या

तालावर खेळाडुनी मान्यवरांना मानवंदना दिली. माजी क्रिकेटर समीर दिघे यांनी चेंडु मारून व बलुन आकाशात सोडुन स्पर्धेचे औपचारिकरित्या उदघाटन केले. त्यानंतर स्वागत सभारंभामध्ये मशाल पेटवुन ती खेळाडुंच्या हस्ते मार्च पास करून मिरविण्यात आली. यावेळी मंचावर कमिशनर ऑफ पोलिस प्रविण पडवळ, माजी क्रिकेटर समीर दिघे, उद्योजक सियाराम सिल्क मिल्सचे चेअरमन रमेश पोतदार, अरहम युवा सेवा ग्रुपचे सागर भयाणी, सिने कलावंत राकेश बापट, डिस्ट्रीक गव्हरनर ऑफ रोटरी शशी शर्मा, सुधा कामत, इस्लाम जिमखान्याचे हानिफ शेख आदी मान्यवरांच्या उपस्थितीत उदघाटनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पहिला सामना पंजाब व शेष महाराष्ट्रा यांच्यात सुरू झाला. अंतिम सामना व बक्षिस वितरणाचा कार्यक्रम ब्रेबॉन स्टेडिअमवर घेण्यात आला. इथे एक ओळ सुर्वण अक्षराने लिहावी वाटते कि, प्रथमच अंध खेळाडुंना ब्रेबॉन स्टेडिअमवर खेळण्याची संधी मिळली. क्रिकेट स्पर्धेत संबंध देशातुन महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, पंजाब, गोवा, दिल्ली और जम्मु काश्मीर हे ८ संघ सहभागी झाले होते. यावेळीया स्पर्धेत अंतिम सामना गुजरात व शेष महाराष्ट्रा या दोन संघामध्ये झाला. मात्र सलग १० व्या वर्षी गुजरातने विजेतेपद आपल्याकडे राखुन ठेवले. पारितोषिक समारंभाकरिता यावेळी मंचावर आमदार प्रसाद लाड, ब्रेबॉन स्टेडिअमचे चेअरमन प्रेमल उदानी, अरहम युवा सेवा ग्रुपच्या एकता मॅडम, रवि मांद्रेकर व आधिक मान्यवर उपस्थित होते. यावेळी विजेत्या संघास २१,०००/— रू व टॉफी देउन गौरविण्यात आले उपविजेत्या संघास १५०००/— रू व टॉफी देउन गौरविण्यात आले. व अन्य संघांना देखील रोख रक्कम व टॉफी देउन गौरविण्यात आले. त्यानंतर मा. पोतदारांनी विश्वचषकात सहभागी झाालेल्या ७ खेळाडुंचा १०,०००/— रू.चे पारितोषिक देउन सत्कार केला व सियाराम च्या वतीने हा कार्यक्रम सातत्याने करण्यात येईल असे त्यांनी आपल्या मनोगतात जाहिर केले. यावेळी आमदार प्रसाद लाड यांनी संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली व खेळाडुंना खेळाडु वृत्तीने खेळण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता रोटरीचे अर्जुन मुद्दा, इस्लाम जिमखान्याचे मॅनेजर हनीफ शेख, संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील, सौ. सपना चांडक, कोषाध्याचा विजया दबे, अनिल वैदय, श्याम मखारीया, मुंबई बिट्स चे उदय सावंत यांनी विशेष परिश्रम घेतले.




१६. **<u>महिला हळदी कुंकु सभारंभ काय्रकम :—</u>** अंध महिलांची मोफत आरोग्य तपासणी, जागतिक महिला दिन असे विविध कार्यक्रम महीलांकरीता संस्थेच्या वतीने राबविले जातात. त्याचप्रमाणे हळदी कुंकु सभारंभ काय्रकम घेतला जातो. दि. ९ फेब्रुवारी २०१९ रोजी महीलांकरीता संस्थेच्या वतीने हळदी कुंकु सभारंभ कार्यक्रम संस्थेच्या कार्यालयात आयोजित केला गेला. संस्थेच्या संचालक सौ. प्रतिभा होळकर यांनी पुढाकार घेवुन अंध महिलांना उपयुक्त अशा वस्तुंचे वाण देवुन हळदी कुंकु सभारंभ काय्रकम साजरा केला.गप्पा गोष्टी, गाणी, मजेदार खेळ घेत अतिशय खेळामेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. संस्थेच्या कार्यकरत्या सौ. सपना चांडक, मुद्रा मराठा महिला मंडळ यांनी संपुण कार्यक्रम सजवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कल्पना पांडे, कोषाध्यक्षा विजया दबे यांनी मोलाचे सहकार्य केले.



१७. **<u>गोमंतक क्रिकेट कप:—</u>** जसे ''मोदी है तो मुमकिन है'' तसेच ''दि ब्लाइंड वेलफेअर है तो मुमकिन है'' असे म्हटले तरी चालेल. कारण यावर्षी प्रथमच संस्थेच्या वतीने **''गोमंतक चॅम्पीयन ट्रॉफी''** हि स्पर्धा घेण्यात आली. गोव्याला क्रिकेट खेळण्याची अंध खेळाडुंची इच्छाही संस्थेने पुर्ण केली. दि. १७ मार्च २०१९ रोजी गोवा सेथील युथ क्रिकेट मैदान पणजी येथे हि स्पर्धा झाली. आय पी एल खेळाडु किंगस एल्हेहन, पंजाबचे स्वपनिल सिंग, तसेच गोव्यातील जेनो फार्मा कंपनीचे डायरेक्टर, यतिन नाईक, प्रदिप मिश्रा, कार्पोरेट झोनल शाखेच्या अन्नपुर्णा मॅडम, हया मान्यवरांच्या उपस्थित हा कार्यक्रम पार पडला. या एकदिवशीय सामन्यात गुजरात व शेष भारत या दोन संघानी सहभाग घेतला होता. यामध्येही गुजरातनेच बाजी मारून प्रथम क्रमांक पटकावला. व शेष भारताला दुस—या क्रमांकावर समाधान मानावे लागले. विजेत्या संघास ३०,०००/— रू व टॉफी देउन गौरविण्यात आले उपविजेत्या संघास २५०००/— रू व टॉफी देउन गौरविण्यात आले. गोव्या सारख्या समुद्रकिनारा व निसर्गरम्य ठिकाणी राहण्याची क्रिकेट खेळाडुंची पहिलीच वेळ होती. सर्वांनी मनमुराद आनंद घेतला. सर्व खेळाडुंनी ''कुछ किये बिना किसी कि जयजयकार नहीं होती, कोशिश करनेवालों कि कभी हार नहीं होती।'' आपण जो आनंद दिला तो गगनात मावेनासा आहे! आम्ही आपल्या कार्याला नमन करतो. अशा शबदांत संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर, महासचिव दत्ता पाटील, सौ. सपना चांडक, कोषाध्याचा विजया दबे, स्पोर्ट वे च्या प्रिती चव्हाण, प्रकाश पलांडे, गोव्याचे सुधिन कामत यांनी विशेष परिश्रम घेतले.







अशा प्रकारे संस्था वर्षभर सातत्याने विविध उपक्रम राबवित असते. मला सांगायला खुप अभिमान वाटतो कि, मागील दहा वर्षापासुन ते आतापर्यंत शुन्यातुन पुढे काटेरी वाटा ओलांडुन हि प्रगती केली आहे. संपुर्ण महाराष्ट्रात संस्थेने आपले उपक्रम रावविले आहेतच पण या वर्षी आम्ही राज्याच्या बाहेरही हे उपक्रम राबविले आणि ते यशस्वी पण झाले. हयात मोलाचा वाटा आहे तो महेंद्रा कोटक, कृष्णकुमार गोयल, कोहिनुर ग्रुप, सियाराम ग्रुपचे चेअरमन रमेश पोतदार, केशव वरखेडकर, नरेंद्र फिरोदिया, जगमोहन मेहता, उल्हास देबडवार अशी काही मोजकी नावे घेता येतील. शिवाय, या वर्षभरात दोन अंध व्यक्तींचे कायम पुनर्वसन करण्यातही आम्हाला यश मिळाले व प्रसारमाध्यमांनीही संस्थेच्या कार्याची दखल घेतल्याने संस्था अनेकांपर्यंत पोहोचु शकली अशा ज्ञात अज्ञातांचे पुनश्च एकदा आभार!

अंध बांधव संस्थेकडे एक मायबाप म्हणुन जेव्हा पाहतात, तेव्हा त्यांच्या संपुर्ण गरजा लक्षात घेवुनच संस्था उपरोक्त उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग १२ वर्षापुर्वी रूजवलेले हे संस्थेचे बीज आज त्याचे मोठया वटवृक्षात रूपांतर झाले आहे. दरवर्षी त्याचा वाढलेला बहर पाहुन खुपच वाटते. हया वृक्षाची सावली दरवर्षी वाढत जावुन त्याचा निवारा माझया सारख्या हजारो अंध बांधवांना मिळो हिच माझी ईश्वर चरणी प्रार्थना!